मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# तब्बल 55 दिवसांनी प्रचारतोफा थंडावल्या

## समरोपाला मुसळधार पाऊस : प्रचारात स्थानिक विषयांवर भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

आरोप- प्रत्यारोप आणि आपल्या विकासकामांचे व्हिजन मांडत शहराच्या स्थानिक प्रश्नांवर रंगलेल्या पुणे लोकसभा मतदारासंघातील जाहीर प्रचार शनिवारी सायंकाळी थांबला. प्रचाराची वेळ संपण्यास अवघ्या १० ते १५ मिनिटे आधी शहरात मुसळधार पावसाने हजेरी लावली.

या निवडणुकीत सर्वाधिक ५५ दिवस प्रचाराला मिळाल्याने उमेदवारांनी शहर पिंजून काढले. यात शहरातील पाणी, वाहतूक कोंडी याच्यासह, स्थानिक मुद्द्यांचीच चर्चा झाली,



दुसऱ्या बाजूला भाजप आणि महायुतीकडून केंद्रातील तसेच राज्यातील दिग्गज नेत्यांची फौज पुण्याच्या प्रचारात उतवित आघाडी घेतलेली असतानाच दुसऱ्या बाजूला कॉंग्रेसकडूनही राज्यातील डझनभर आमदार पुण्यात मुक्कामी ठेवत शेवटच्या तीन दिवसात केंद्रीय पातळीवरील नेत्यांच्या ठराविक वर्गांसाठी बैठका घेत शेवटच्या टप्प्यात प्रचारात चुरस आणली. त्यामुळे एकहाती विजयाची आशा असलेल्या भाजपसमोर आव्हान उभे झाले आहे.

यंदाची निवडणूक खऱ्या अर्थाने पुणेकरांच्या प्रश्नावर चर्चेत आली. मागील दोन वर्षांपासून महापालिकेवर प्रशासक असल्याने नागरिकांना पाणी, रस्ते, ड्रेनेज, स्वच्छता अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्याचे पडसाद या निवडणुकीत दिसून आले. प्रचारासाठी आलेल्या उमेदवारांनाही याच प्रश्नांचा सामना करावा लागला.

त्याचवेळी महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केले असले, तरी भाजपच्या नेत्यांकडून संपूर्ण प्रचारात ही निवडणूक मोदी विरोधात राहूल गांधी असल्याचा प्रचार केला. तर कॉंग्रेस नेत्यांकडून प्रचाराच्या शेवटच्या दिवसा पर्यंत महागाई आणि संविधानात बदल केला जाणार असल्यावरच भर दिल्याचे पहायला मिळाले

राज्यात 13 मे रोजी नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, मावळ, अहमदनगर, पुणे, शिरुर, शिर्डी, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या मतदारसंघात मतदान होणार आहे. शनिवारी प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने उमेदवारांनी जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. चौथ्या टप्प्यात अनेक लढती या चुरशीच्या होणार आहेत.

### प्रचार काळातील अनुभव

» यंदाच्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कॉंग्रेस नेते राहूल गांधी यांच्या सभांनी पुण्यात रंगल आणली. दि. १८ एप्रिलनंतर उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरू झाल्याने त्यानंतरच प्रचारात रंगत आली.२८ एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुण्यात रेसकोर्स येथे सभा झाली तर ३ मे रोजी राहूल गांधी यांची एसएसपीएमएस मैदानावर सभा झाली. या दोन्ही सभांना मोठी गर्दी झाली होती. तर, या सभा नंतर दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते अधिक आक्रमकपणे प्रचारात सहभागी झाल्याचे पहायला मिळाले.

# मावळातील सरासरी मतदान 60 टक्केच,यंदा किती होणार मतदान?

## मावळ लोकसभा मतदारसंघात गेल्या तीन निवडणुकांमध्ये सरासरी 60 मतदान झाले

**पिंपरी| प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघात गेल्या तीन निवडणुकांमध्ये सरासरी ६० मतदान झाले आहे. त्यामुळे यंदा मतदानाची टक्केवारी वाढणार का, किती टक्के मतदान होणार, याकडे लक्ष लागले आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघाची २००९ मध्ये निर्मिती झाली. त्यानंतर झालेल्या पहिल्या निवडणुकीसाठी एकूण १६ लाख ४ हजार ८८६ मतदार होते. त्यामध्ये फक्त ७ लाख १७ हजार ७१६ मतदारांनी मतदान केले. ही टक्केवारी ४४.७१ एवढी होती. त्यानंतर २०१४ ला झालेल्या निवडणुकीमध्ये एकूण १९ लाख ५३ हजार ७४१ मतदार होते. त्यापैकी ११ लाख ७४ हजार ३८० मतदारांनी आपला हक्क बजाविला. ही टक्केवारी ६०.११ एवढी होती.२०१९ मध्ये एकूण मतदार २२ लाख ९८ हजार ८० इतके होते.यावेळी २०१४ च्या टक्केवारीचा विचार करता कमी मतदान झाले. एकूण मतदारांपैकी १३ लाख ६८ हजार ८७२ मतदारांनी बाहेर पडत मतदान केले. यावेळी ५९.५७ टक्के मतदान झाले.



भारतात मतदारांची संख्या पाहता जगात सर्वाधिक भारतीय मतदारांची संख्या अधिक असल्याचं समोर आले आहे. 85 वर्षांहून अधिक वय असणाऱ्यांना घरीच मतदानाची सोय केली जाणार आहे.

### मतदार जनजागृती जोरात

» निवडणूक आयोग आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने चिंचवड, पिंपरी आणि भोसरी या तिन्ही विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली आहे. मात्र, शनिवार, रविवार आणि आज सोमवारी मतदानाची सुट्टी अशा जोडून तीन सुट्या आल्या आहेत. त्यामुळे याचा मतदानावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

### गेल्या तीन लोकसभा निवडणुकांतील मतदान

- » २००९ – ४४.७१ टक्के
- » २०१४ – ६०.११ टक्के
- » २०१९ – ५९.५७ टक्के

# देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सुरक्षित शहर

## विरोधकांचा आरोपांना मुरलीधर मोहोळ यांचे सडेतोड उत्तर

**पुणे | प्रतिनिधी**

“कायदा-सुव्यवस्था, तसेच गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण विचारात घेता पुणे शहर देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सुरक्षित शहर असल्याचे राष्ट्रीय गुन्हे सांख्यिकी विभागाने (एनसीआरबी) प्रसिद्ध केलेल्या अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे पुण्याच्या कायदा-सुव्यवस्थेबाबत विरोधी पक्षांनी केलेले आरोप बिनबुडाचे आणि खोडसाळ आहेत,’ असा दावा पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी केला.

मोहोळ यांच्या प्रचारार्थ सदाशिव पेठ नारायण पेठ शुक्रवार पेठ शनिवार पेठ परिसरामध्ये प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, कसबाचे निवडणूक प्रमुख हेमंत रासने, राजेश येनपुरे, गायत्री खडके, कुणाल टिळक, बापू मानकर, राजेंद्र काकडे, अमित कंक, राजू परदेशी, राणी कांबळे, प्रशांत सुर्वे, चंद्रकांत पोटे, अजय दराडे, निलेश जगताप, प्रणव गंजीवाले, वैशाली नाईक, निर्मल हरीहर, अश्विनी पवार सहभागी झाले होते.

मोहोळ म्हणाले, “उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे पोलिसांनी शहरातील संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) आणि झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायद्यान्वये (एमपीडीए) कारवाई केली.

गुंड, तसेच सराईत चोरट्यांच्या टोळ्यांविरुद्ध बडगा उगारला आहे. त्यामुळे गुंडांना जरब बसली आहे. गंभीर गुन्हे रोखण्यासाठी कारवाई, तसेच कायदा-सुव्यवस्थेला प्राधान्य, वाढती सायबर गुन्हेगारी लक्षात घेता स्वतंत्र सायबर पोYHस ठाणे कार्यान्वित करण्यात आले आर्थिक गुन्ह्यांसाठी स्वतंत्र शाखा निर्माण केली आहे. त्यामुळे पुणे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सुरक्षित शहर ठरले आहे.’



### प्रचार काळातील अनुभव

» “संपूर्ण प्रचार काळात शहरातील वाड्या-वस्त्यांपासून, सोसायट्यांना भेटी दिल्या. आबालवृद्ध, महिला, युवकांनी भरभरून स्वागत केले. या निमित्ताने त्या त्या भागातील नागरी प्रश्न पुन्हा एकदा अधोरेखित झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात गेल्या दहा वर्षांतील भाजपच्या सत्ताकाळात झालेली विकासकामे आणि विविध योजनांचा लाभार्थ्यांना मिळालेले लाभ याबद्दल नागरिक भरभरून बोलत होते. आम्ही मोदीजींचा नमस्कार त्यांच्यापर्यंत पोहोचवत होतो. नागरिक आपल्या समस्या मांडत होते. संपूर्ण शहराचा शाश्वत विकास करण्याच्या दृष्टीने, विकसित भारतासाठी आम्ही आमच्या योजना आणि जाहीरनामा नागरिकांपर्यंत पोहोचवला. तो तयार करण्यासाठी पुणे नेक्स्टच्या माध्यमातून पुणेकरांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांचाही जाहीरनाम्यात समावेश केला.कोरोना काळात आम्ही महापालिकेच्या माध्यमातून केलेल्या कामाची लोकांना जाणीव होती. ती त्यांनी पदोपदी बोलून दाखवली. पुणे लोकसभेसाठी महायुतीचा उमेदवार म्हणून मला पुणेकरांकडून खूप प्रेम आणि विश्वास मिळाला. यामुळे माझा आत्मविश्वास दुणावला आहे. अधिक चांगले सामाजिक, राजकीय काम करण्याची प्रेरणा मला मिळाली. मतदारांचा मतरूपी आशिर्वाद मला १३ मे रोजी मिळेल आणि मी विक्रमी मताधिक्याने विजयी होईन, नव्हे विजयाचे रुपांतर महाविजयात होईल असा विश्वास वाटतो. सर्वांच्या प्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो.”

# मतदानाच्या दिवशी शहर परिसरात कडक बंदोबस्त

## पुणे लोकसभा मतदार संघातील मतदान सोमवारी त्या दिवशी कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा मतदारसंघातील मतदान सोमवारी पार पडणार असून, मतदान केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

पुणे लोकसभा मतदार संघातील मतदान सोमवारी होणार आहे. त्या दिवशी शहरात कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. शहर परिसरात पाच हजार पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे दोन हजार जवान, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या तुकड्या, तसेच राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्या बंदोबस्तास तैनात राहणार आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्यात पुण्यातील शांततेत पार पाडणे, तसेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या दृष्टीने पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे. मतदानाच्या दिवशी शहर, तसेच उपनगरातील मतदान केंद्रांच्या परिसरात कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चार अतिरिक्त पोलीस आयुक्त, नऊ पोलीस उपायुक्त, १७ सहायक आयुक्त, ६४ वरिष्ठ पोलीस निरीक्षक, २९६ सहायक निरीक्षक, उपनिरीक्षक, तसेच पाच हजार ५८४ पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे दोन हजार जवान, राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) दोन तुकड्या, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) तीन तुकड्या असा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

पुणे लोकसभा मतदार संघात दोन हजार १८ मतदान केंद्रे आहेत. त्यापैकी १८५ मतदान केंद्रात पाचपेक्षा जास्त मतदान कक्ष आहेत. वडगाव शेरी, कोथरुड, पर्वती, शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात मतदान केंद्रातील इमारतीत पाचपेक्षा जास्त मतदान कक्ष आहेत. शिरुर लोकसभा मतदार संघातील काही भागाचा समावेश पुणे पोलीस आयुक्तालयात होतो. पुणे पोलिसांकडून पुणे लोकसभा, तसेच शिरुर लोकसभा मतदार संघात बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. मतदान केंद्रांच्या शंभर मीटर परिसरात छायाचित्रण करण्यास मनाई करण्यात आली आहे. ज्वलनशील वस्तू, शस्त्र बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. मतदान केंद्रांच्या परिसरातील प्रतिबंधात्मक आदेश उमेदवारांसह, त्यांचे प्रतिनिधी आणि मतदारांना लागू राहणार आहेत. आदेशाचा भंग केल्यास कारवाई करण्याचा इशारा सहपोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिला आहे.



### मतदान केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

» लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात पुणे लोकसभा मतदारसंघात सोमवारी (१३ मे) मतदान होणार आहे. पुणे लोकसभा मतदारसंघात दोन हजार १८ मतदान केंद्रे आहेत. शिरूर लोकसभा मतदारसंघातील काही भागाचा समावेश पुणे पोलीस आयुक्तालयात होतो. पुणे पोलिसांकडून पुणे लोकसभा, तसेच शिरूर लोकसभा मतदारसंघात बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. मतदान केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. मतदान केंद्रांच्या परिसरात शंभर मीटर परिसरात मोबाइल संचाचा वापर न करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुणे लोकसभा मतदारसंघातील मतदान सोमवारी पार पडणार असून, मतदान केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग केल्यास कारवाई करण्याचा इशारा सहपोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिला आहे.”

# ठाकरे यांनी पाठीत खंजीर खुपसला

## भाजप ठाकरे यांना सोबत घेणार नसल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. त्यामुळे भाजप ठाकरे यांना कसे सोबत घेईल, असा सवाल करत भाजप ठाकरे यांना सोबत घेणार नसल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.मावळचे महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचाराची मुख्यमंत्री शिंदे यांच्या 'रोड शो'ने सांगता झाली. पिंपरी-चिंचवड शहरात अडीच तास मुख्यमंत्र्यांनी 'रोड शो' केला. खासदार बारणे, आमदार अण्णा बनसोडे, अश्विनी जगताप, उमा खापरे, महेंद्र थोरवे रोड शोमध्ये सहभागी झाले होते.

देशासाठी काही करायचे असेल तर शरद पवार, उद्धव ठाकरे यांनी खऱ्या राष्ट्रवादी आणि शिवसेनेसोबत यावे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्यावर बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की उद्धव ठाकरे यांनी भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. त्यामुळे त्यांना भाजप सोबत घेणार नाही.

इंग्रजांना घालवले तर पंतप्रधान नरेंद्र मोदी काय चीज आहेत, या शरद पवार यांच्या विधानाचा समाचार घेताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, इंग्रजांनी दीडशे वर्षे राज्य केले. दहा वर्षांत अर्थव्यवस्थेमध्ये इंग्रजांनाही पाठीमागे सोडणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. रोखठोक बोलणारे, पाकिस्तानला थडा शिकविणारे, 'सर्जिकल स्ट्राइक' करणारे मोदी आहेत. पूर्वी सैनिकांचे मुंडके छाटून पाकिस्तानमध्ये नेण्याची हिंमत दहशतवादी करत होते. आता ती हिंमत गेली. एकही बॉम्बस्फोट होत नाही. 'सर्जिकल स्ट्राइक' करून सैन्यांवरच्या हल्ल्याचा बदला घेणारे पंतप्रधान आहेत. मजबूर नाही तर मजबूत भारत होत आहे. एकीकडे देशभक्त आणि दुसरीकडे देशद्रोहाची भाषा करणारे आहेत. पराभव होणार असल्याने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. विरोधक पाकिस्तानची भाषा बोलू लागले आहेत. विकासाचे मुद्दे बाजूला ठेवून नवीन मुद्दे आणून विकासापासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु, पुन्हा एकदा मोदी सरकार हे जनतेने ठरविल्याचेही शिंदे म्हणाले.

एकनाथ शिंदे यांनी गद्दारी केली. त्याचा राग राज्यातील जनतेला आलेला आहे. तुम्ही गद्दारी करून राजकारणातल्या आईशी हरामखोरपणा केलात, शिवसेनेशी गद्दारी केलीत. तुम्हाला राजकीय जन्म देणाऱ्या शिवसेना या आईच्या कुशीवर तर तुम्ही वार केला, पण महाराष्ट्राशीही तुम्ही गद्दारी केलीत. ती महाराष्ट्रात नाही चालणार! तुम्ही शिवसेनेशीच गद्दारी नाही केली. तर महाराष्ट्राचाही घात केला आहे. मोदींनी उद्योगधंदे गुजरातला पळवले. हे फक्त पाहत बसले होते, असा जोरदार हल्ला उद्धव ठाकरे यांनी चढवला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना म्हणजे एसंशि आहे असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला आहे. यापूर्वी उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला मिंधे गट असं नाव देऊन हल्ला चढवला होता.



### महायुतीला 45 पेक्षा जास्त जागा

» राज्यात मतदानाचे तीन टप्पे पार पडले आहेत आणि चौथ्या टप्प्याचे मतदान १३ तारखेला होत आहे. कोणी काहीही बोलू देत, पण राज्यात महायुती ४५ पेक्षा जास्त जागा जिंकणार, हे निश्चित आहे, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

# चुकीचे संदेश, अफवा पसरविल्यास कठोर कारवाई

## जिल्हा निवडणूक प्रशासनाचा इशारा ; यादीत नाव असेल तरच मतदान

**पिंपरी | प्रतिनिधी**

मतदार यादीतील नावावर डिलीट असा शिक्का मारला असल्यास करायच्या कार्यवाहीची चुकीच्या माहितीबाबतचा संदेश व्हॉट्सअपद्वारे प्रसारीत केल्याबद्दल एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याच्यादृष्टीने प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनाने दिली आहे. असे चुकीचे संदेश, अफवा पसरविल्यास कठोर कारवाई करण्यात येईल असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

मतदान यादीत नाव नसल्यास नमुना क्र.१७ चा अर्ज भरून आणि आपले मतदार ओळखपत्र दाखवून मतदान करता येणार असल्याचा दिशाभूल करणारा संदेश संबंधित व्यक्तीने व्हॉट्सअपद्वारे पसरविला आहे, अशा संदेशामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून नागरिक व प्रशासन अशा दोघांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या संदेशामुळे हडपसर येथील मतदार नोंदणी कार्यालयात नागरिकांनी चौकशीसाठी गर्दी केली होती. म्हणूनच प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत, असे संदेश जिल्ह्यात पसरविले जात असल्याचे निदर्शनास आले असून दिशाभूल करणाऱ्या संदेशांपासून सावध रहावे अफवांवर विश्वास ठेऊ नये तसेच असे संदेश पुढे पाठवू नयेत, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार नोंदणीबाबत विशेष संक्षिप्त मोहीम २०२४ अंतर्गत मतदार नोंदणी, वगळणी व दुरुस्तीबाबत सर्व विधानसभा मतदार संघात गेली वर्षभर काम करण्यात आले असून त्यानुसार मतदार याद्या अद्ययावत करण्यात आल्या आहेत. मतदाराचे नाव वगळणी करताना नियमानुसार सर्व कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे,

त्यामुळे व्हॉट्सॲप संदेशाद्वारे प्रसारीत केलेली माहिती अत्यंत चुकीची आहे, असे स्पष्ट करुन संबंधित व्यक्तीला याबाबत खुलासा २४ तासात सादर करण्याचे आदेश संबंधित व्यक्तीला जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे देण्यात आले आहेत. खुलासा प्राप्त न झाल्यास कारवाई करण्यात येणार असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

मतदार यादीतील नावावर वगळले गेले असल्यास संबंधितांना मतदान करता येईल, असा एक संदेश समाजमाध्यमांत मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे हा संदेश चुकीचा असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. हा संदेश व्हायरल करणाऱ्या एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनाने दिली. मतदानाबाबत चुकीचा संदेश, अफवा पसरविल्यास कठोर कारवाई इशाराही प्रशासनाने दिला आहे.



> मतदार यादीत नाव नसेल तर संबंधित व्यक्तीस मतदान करता येणार नाही. मतदार यादीत नाव असल्यास मतदार ओळखपत्र किंवा भारत निवडणूक आयोगाने मान्य केलेल्या १२ पुराव्यापैकी एक दाखवून मतदान करता येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.
>
> \- डॉ. सुहास दिवसे, निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा

# मेट्रो प्रकल्पातून वाहतूक कोंडी सोडवणार

## नितीन गडकरी : वाघोलीत आढळरावांच्या प्रचारसभेत अजित पवार, बावनकुळेंची उपस्थिती

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर मतदारसंघातील वाहतुकीचा प्रश्न कायमचा दूर करण्यासाठी उड्डाणपूल आणि मेट्रो प्रकल्पाच्या विस्तारीकरणाचे काम मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. या कामांमुळे वाहतुकीचा प्रश्न कायमचा संपुष्टात आणणार, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी वाघोली येथे दिली.

काही हजार कोटींची ही कामे मार्गी लावायची आहेत, यासाठी मोदींना साथ देणारा माणूस म्हणून आढळराव संसदेत पाहिजेच असे आवाहन त्यांनी आढळरावांच्या प्रचारार्थ आयोजित वाघोली येथील सभेत बोलताना केले.



उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, भाजपच्या महिला जिल्हाध्यक्षा पूनम चौधरी, माजी आमदार बापूसाहेब पठारे, पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, शिवसेना नेते मिलिंद हरगुडे, सुरेश घुले,

वैशाली नागवडे, दादासाहेब सातव, रोहिदास उंद्रे, भगवान शेळके, धर्मेंद्र खांडरे, शामराव कोतवाल, संदीप सातव, संदीप कांचन, तसेच महायुतीचे विविध घटक पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आढळराव पाटील म्हणाले की, गेल्या 20 वर्षांपासून महामार्ग, पुणे-नाशिक रेल्वेसाठी मी पाठपुरावा करतोय. बैलगाडा शर्यतीसाठी लढा दिलाय. या श्रेय विरोधी उमेदवार घेतात.

दोन चार वर्षात अशी कामे होतात का? असा प्रश्न त्यांनी केला. पराभव दिसायला लागल्याने खोटेनाटे आरोप, व्यक्तिगत पातळीवर होत आहे. मी वनखात्याची जमीन लाटली असा आरोप केला. पण माजी सैनिक असलेल्या माझ्या भावाला सरकारने जमीन दिली. त्यांनी या वक्तव्यातून माजी सैनिकाचा अपमान केला आहे. पराभवाच्या छायेतून ते आरोप करत आहेत.

यासाठी मोदींना पुन्हा निवडून देण्याची गरज आहे. वाघोलीचे अनेक प्रश्न आहेत. निवडणूक संपल्यानंतर त्या प्रश्नाकडे निश्चित लक्ष देईल. डॉ अमोल कोल्हे हे अभिनेते आहेत. ते अभिनेत्याचेच काम करणार. त्यांना विकास कामे करणे जमणार नाही. यामुळे मतदारांनी आढळरावानाच निवडून द्यावे. असे आवाहनही पवार यांनी केले.

> माझ्या घरात आईवडीलांचा नाही, तर शिवछत्रपतींचा फोटो आहे. त्यांची शिवशाही आणि प्रभू श्रीरामाचं रामराज्य आम्हाला आणायचे आहे. शिवाजी महाराजांनी अनेक लढाया जिंकल्या एकतरी मशिद तोडली का; मात्र काँग्रेसकडून शिवशाहीचा विचार करून मार्गक्रमण करणाऱ्यांवर गरळ ओकली जात आहे. याला कोणताच मतदार थारा देणार नाही.
>
> – नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री

> पुणे-नगर रस्त्यालगत तिसऱ्या पुण्याचा विचार करायला लागेल. पुढील 20 ते 50 वर्षांचा विचार करून मतदार संघातील वाहतूक, पिण्याचे पाणी, रस्ते, कचरा अशा विविध समस्या सोडविण्यासाठी, पुणे वाघोली मेट्रो मंजूर करून ती वढूपर्यंत आणण्यासाठी, मुळशीचं पाणी या भागात आणायचंय त्यासाठी केंद्राचा निधी आणावा लागेल. देशाची अर्थव्यवस्था बळकट करणाऱ्या मोदींच्या पाठबळासाठी आढळराव यांना संधी द्या.
>
> - अजित पवार, उपमुख्यमंत्री

# महावितरणचा सावळा गोंधळ कुरुळी परिसरातील ग्राहक वैगातले

## केव्हाही वीजपुरवठा खंडित होत असल्याने व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्याच्या दक्षिण भागातील कुरुळी-चिंबळी-मोई परिसरात महावितरणचा सावळा गोंधळ सुरू आहे. दररोज केव्हाही वीजपुरवठा खंडित होत असल्याने छोट्या-मोठ्या व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने व्यावसायिक संतप्त झाले आहेत. तर नियमित विजबिल भरूनही अखंडित सेवा मिळत नसल्यने ग्राहक हैराण झाले असून महावितरण विरोधात संतापाची सुप्त लाट निर्माण झाली आहे.

परिसरातील विविध छोटेमोठे उद्योग अक्षरश:मेटाकुटीस आले असून याबाबत कोणाकडे दाद मागायची असा प्रश्न निर्माण झाला आहे मिळावी, अशी मागणी उद्योगपतींनी केली आहे. वीजबिल भरण्यासाठी चार दिवस विलंब झाला की महावितरणचे कर्मचारी मीटर बंद करण्यासाठी येतात. मग दुरुस्ती का करत नाहीत असा प्रश्न ग्रामस्थ विचारात आहेत. कुरुळी-मोई रस्त्याच्या साइडपट्ट्यावर नवीन खासगी रोहित्र उभारले असून रस्त्यालगत असणाऱ्या रोहित्र व गाडीचा अपघात झाल्यास अधिकारीच जबाबदार असतील.



कुरुळी येथील सोनवणेवस्ती परिसरात विविध कंपन्या असून मु-हे वस्ती, गायकवाड वस्ती, डोंगरे वस्ती, कड वस्ती, बागडे वस्ती परिसरात विविध कंपन्यांची गोदामे व शेतकऱ्यांच्या शेतीतील विविध माल, कोल्ड स्टोअरेज गोदाम असल्याने अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने प्रचंड आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे, तरी महावितरणने त्वरित अखंडीत वीजपुरवठा करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य शरद मु-हे यांनी केली आहे.

### मागणी करूनही कामे होत नाहीत

» नवीन रोहित्र, वाकलेले-जीर्ण झालेले खांब, लोंबकळणा-या तारा बदलण्याची मागणी करून देखील काम होत नाही. या परिसरात निवासी व वाणिज्य ग्राहकांची संख्या असल्याने मिळणाऱ्या तुटपुंज्या सुविधा पुरविण्यात महावितरण कमी पडत असल्याचे चाकण महावितरण कार्यालयात वीज ग्राहक व ग्रामपंचायतीने केलेल्या पत्र व्यवहार नमूद केले आहे.कुरुळी परिसरात महावितरणचा सावळा गोंधळ सुरू आहे. दररोज वीजपुरवठक खंडित होतो. अभियंता, कर्मचा-यांचा हलगर्जीपणा आहे. वीजपुरवठा सुरळीत सुरू करावा, अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल.